**ठळक बातम्या**

- तूर, मसूर आणि उडदाचं संपूर्ण उत्पादन किमान हमीभावानं खरेदी करण्याची केंद्रीय कृषी मंत्र्यांची ग्वाही
- स्थलांतरित आणि परदेशी नागरिक विधेयक लोकसभेत मंजूर; बोगस पासपोर्ट किंवा विजा असणाऱ्यांना ७ वर्षाच्या कारावासाची तरतूद
- देशात लवकरच सहकारी तत्त्वावर टॅक्सी सेवा सुरू होणार

**आणि**

- खेलो इंडिया पॅरा गेम्स स्पर्धेचा नवी दिल्लीत समारोप, ४३ पदकांसह महाराष्ट्र पाचव्या स्थानी

**<><><><><>**

तूर, मसूर आणि उडदाचं जेवढं उत्पादन होईल ते सर्व किमान हमीभावाने खरेदी करण्याचा निर्णय केंद्रसरकारने घेतला आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याणमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत कृषी भवन इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले. याकरता शेतकऱ्यांना नाफेड आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघाच्या पोर्टलवर नोंदणी करावी लागेल. शेतकऱ्यांना तूर, मसूर आणि उडदाचा योग्य भाव मिळावा याकरता राज्यसरकारांनी प्रभावी आणि पारदर्शी खरेदी पद्धत राबवावी असं आवाहन त्यांनी केलं.

येत्या ४ वर्षात या अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्णता साध्य करण्याचं उद्दिष्ट अर्थसंकल्पात निश्चित करण्यात आलं आहे. केंद्रसरकारने चालू रबी

हंगामात ३७ लाख ३९ हजार टन कडधान्यांच्या तर २८ लाख २८ हजार टन राईच्या खरेदीला मान्यता दिली आहे, अशी माहिती त्यांनी दिली. खरीपातली तूर खरेदी २ लाख ४६ हजार टन पर्यंत झाली असून त्याचा फायदा १ लाख ७१ हजार शेतकऱ्यांना मिळाला आहे. महाराष्ट्र, गुजरात,आंध्र प्रदेश, तेलंगण आणि कर्नाटकमधे हमीभावाने खरेदी सुरु असून कर्नाटकात खरेदीची मुदत १ मे पर्यंत वाढवण्यात आली आहे.

**<><><><><>**

व्यवसाय, शिक्षण, संशोधन, पर्यटन आणि आरोग्यासाठी देशात येणाऱ्यांचं स्वागत आहे. मात्र देशाला धोका निर्माण करू इच्छिणाऱ्यांना सडेतोड उत्तर दिलं जाईल, असं स्पष्ट प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. लोकसभेत स्थलांतरित आणि परदेशी नागरिक विधेयकावरील चर्चेला ते उत्तर देत होते. हे विधेयक आज लोकसभेत मंजूर झालं. या विधेयकामुळे देशाची सुरक्षा मजबूत होईल, अर्थव्यवस्था आणि व्यवसायाला चालना मिळेल याशिवाय आरोग्य आणि शिक्षण क्षेत्राला चालना मिळेल असं ते म्हणाले. यामुळे भारतात येणाऱ्या प्रत्येक विदेशी व्यक्तीची तत्काळ माहिती मिळेल, असंही त्यांनी सांगितलं. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड - व्हाइस कास्ट….**

*स्थलांतरित आणि परदेशी नागरिक  विधेयक संविधान विरोधी असल्याचा आरोप काँग्रेसचे मनिष तिवारी यांनी चर्चेला सुरुवात करताना केला. यातल्या तरतुदींमुळे स्थलांतरितांच्या संदर्भात अधिकाऱ्यांना जादा अधिकार मिळणार असून त्यांच्याकडून त्याचा गैरवापर*

*होण्याची शक्यता आहे असं ते म्हणाले. सखोल तपासणासाठी हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवावं अशी मागणी त्यांनी केली. पाहुण्यांचं स्वागत करणं ही भारताची संस्कृती आहे पण त्याच वेळी देशाच्या सीमांचं आणि हिताचं रक्षण करणं महत्त्वाचं आहे असं भाजपाच्या अपराजिता सरंगी म्हणाल्या.*

*बोगस पासपोर्ट किंवा विजासह आढळून आलेल्या व्यक्तींना ७ वर्षांपर्यंत कारावास आणि १० लाखापर्यंत दंड करण्याची तरतूद या विधेयकात आहे. वैध पासपोर्ट किंवा इतर कागदपत्रांशिवाय देशात प्रवेश करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींना ५ वर्षांपर्यंत कारावास आणि ५ लाखांचा दंड करण्याची तरतूद यात आहे. हॉटेल, विद्यापीठ, इतर शैक्षणिक संस्था, रुग्णालयांना त्यांच्याकडे येणाऱ्या परदेशी व्यक्तींची माहिती देणं आवश्यक असेल. परदेशी नागरिक वारंवार भेट देत असलेल्या ठिकाणांवर विविध निर्बंध लादण्याचे अधिकार यामुळे केंद्र सरकारला मिळतील. पासपोर्ट कायदा १९२०, परदेशी नागरिक नोंदणी कायदा १९३९, परदेशी नागरिक कायदा १९४६ आणि स्थलांतरित कायदा २००० ची जागा हे विधेयक घेणार आहे.*

**<><><><><>**

उबर आणि ओला या टॅक्सीसेवांच्या धर्तीवर केंद्र सरकार सहकार टॅक्सी सेवा सुरू करणार असल्याची घोषणा केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शहा यांनी केली. लोकसभेत आज चर्चेदरम्यान शहा यांनी ही घोषणा केली आहे.

**होल्ड बाईट - अमित शहा....**

तसंच, सरकार लवकरच एका विमा कंपनीची स्थापना करणार असून ही कंपनी देशातल्या सहकारी व्यवस्थेतले विम्याचे व्यवहार हाताळेल, असंही शहा म्हणाले.

**<><><><><>**

देशातल्या विमान तिकीटांच्या किमती तपासण्यासाठी केंद्राने राज्यांना विमान टर्बाईन इंधनावरचा कर कमी करण्यासाठी पत्र लिहिलं आहे. लोकसभेत आज प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान विमान तिकिटांच्या किमतीसंदर्भातल्या पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना नागरी उड्डाण मंत्री के. राममोहन नायडू म्हणाले की, विमानाच्या तिकीटाच्या किमतीचा ४५ टक्के भाग हा या कराचा असतो. काही राज्यं या इंधनावर २९ टक्के कर आकारत आहेत तर काहींनी तो पाच टक्क्याहून कमी केला आहे, अशी महिती नायडू यांनी लोकसभेत दिली. विमानाच्या तिकिटाचा दर हा मागणीवर आधारित असून तो दर सरकार निश्चित करत नसल्याचंही नायडू यांनी यावेळी स्पष्ट केलं.

<><><><><>

वित्तविधेयक २०२५ आणि विनियोजन विधेयक २०२५ चर्चा करुन राज्यसभेनं आज लोकसभेला पाठवलं. लोकसभेत आधीच या विधेयकाला मंजुरी मिळाली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांनी चर्चेला प्रारंभ केला. अन्न, शिक्षण आणि आरोग्यक्षेत्रात महागाई झाली असून  बेरोजगारी वाढत आहे असं ते आपल्या भाषणात म्हणाले. तृणमूल काँग्रेसच्या सागरिका घोष म्हणाल्या, की गरीबांची क्रयशक्ती आणि खासगी गुंतवणूक घसरत आहे. करआकारणी जास्त होत असल्याने भारतात उपभोगाचं प्रमाण कमी झाल्याचा दावा आपचे राघव चढ्ढा यांनी केला. केंद्र सरकारने लाखो तरुणांमधे कौशल्यविकास घडवून आणला असून ग्रामीण भागातही स्वतःची वाहनं, विजेवरची उपकरणं, आणि काँक्रीटची घरं दिसतात असं राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रफुल्ल पटेल यांनी सांगितलं.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याविरुद्धचा हक्कभंग प्रस्ताव राज्यसभा अध्यक्ष जगदीप धनखड यांनी आज फेटाळून लावला. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी यांच्याविरुद्ध अपमानजनक टिप्पणी केल्याप्रकरणी काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी या प्रस्तावाची नोटीस दिली होती. २५ मार्च  रोजी राज्यसभेत आपत्ती व्यवस्थापन विधेयकावर बोलताना शहा यांनी ही टिप्पणी केली होती. या विधानात आपल्याला मर्यादांचं उल्लंघन आढळलं नाही असं धनखड यांनी सांगितलं. अध्यक्ष जगदीप धनखड यांनी सदस्यांच्या वर्तनासाठी नवे मार्गदर्शन तत्वं जारी करायला आचारसंहिता विषयक समितीला सांगितलं आहे.

<><><><><>

अवैध स्थलांतरीतांची भारतात रवानगी करताना त्यांच्या धार्मिक भावना आणि खाण्या-पिण्याच्या सवयींचा आदर ठेवण्याची विनंती भारतानं अमेरिकेला केली आहे. फेब्रुवारी महिन्यात भारतात पाठवलेल्या शीख नागरिकांना पगडी काढण्याच्या सूचना दिल्या नव्हत्या, असं उत्तर यावर अमेरिकी प्रशासनानं दिलं आहे. परराष्ट्र राज्यमंत्री किर्ती वर्धन सिंग यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली.

<><><><><>

उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे जादा गाड्या सोडण्यात येणार आहेत.  दररोज लांब पल्ल्याच्या ७६४ फेऱ्यांचं नियोजन करण्यात आलं आहे. १५ एप्रिल ते

१५ जून या कालावधीत ही सुविधा उपलब्ध असून महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर आरक्षण करता येईल.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेतल्या, कोलकत्ता नाईट रायडर विरुध्द राजस्थान रॉयल्स यांच्यात झालेल्या सामन्यावर सट्टा लावणाऱ्या चार संशयितांना जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं आज अटक केली. संशयितांकडून मोबाईल आणि इतर साहित्य, असा एकूण ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**<><><><><>**

जळगावचे सैन्यदलातले शहीद जवान अर्जून बावस्कर यांच्या पार्थिवावर आज जळगाव इथं कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शासकिय इतमात अंतिम संस्कार करण्यात आले. २४ मार्चला अरुणाचल प्रदेशात नियंत्रण रेखास्थित डोपावा इथं कर्तव्य बजावीत असताना त्यांना वीरमरण आलं होतं.

**<><><><><>**

खेलो इंडिया पॅरा गेम्स स्पर्धेचा आज नवी दिल्लीत समारोप झाला. आज शेवटच्या दिवशी झालेल्या खेळांमध्ये टेबिल टेनिसच्या अंतिम फेरीत शशिधर कुलकर्णी, दत्तप्रसाद ज्योतिराम चौगुले आणि विश्वविजय तांबे यांनी विविध श्रेणींमध्ये सुवर्णपदकं जिकंली. तर महिलांच्या गटात देवयानी वाल्हे हिनंही सुवर्णपदक जिंकलं.

या स्पर्धेत महाराष्ट्र ४३ पदकासंह पदकतालिकेत पाचव्या स्थानावर आहे. त्यात १८ सुवर्ण, १३ रौप्य आणि १२ कास्य पदकांचा समावेश आहे.

पहिल्या स्थानावर हरयाणा असून त्यानंतर तामिळनाडू, उत्तर प्रदेश, राजस्थान यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबादमधे सनरायजर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना सुरु आहे. लखनौ सुपर जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा सनरायजर्स हैदराबादच्या ७ षटकात २ बाद ७१ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**